<u>प्रसिध्दीसाठी</u>

मुंबई,
दि.२९.११.२०१९

# महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या विविध इमारतींचे नामकरण.
## <u>इंग्रज राजवटीतील नांवे बदलून सहकार धुरीणांची नांवे दिली.</u>

राज्यातील सहकारी संस्थांचे पालकत्व स्वीकारलेली व १०८ वर्ष पूर्ण करुन, १०९ व्या वर्षात पदार्पण केलेल्या राज्य सहकारी बँकेच्या विविध इमारतींचा नामकरण सोहळा बँकेचे मा.प्रशासक श्री.विद्याधर अनास्कर, समिती सदस्य श्री.अविनाश महागांवकर व श्री.संजय भेंडे, व्यवस्थापकीय संचालक डॉ.अजित देशमुख यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

राज्य सहकारी बँकेचे संस्थापक अध्यक्ष सर विठ्ठलदास ठाकरसी, बँकेचे तत्कालीन अध्यक्ष प्रा.धनंजयराव गाडगीळ तसेच सहकार चळवळीचे प्रणेते व राज्य बँकेचे शिल्पकार वैकुंठभाई मेहता यांच्या स्मृती प्रित्यर्थ बँकेच्या विविध इमारतींना त्यांची नांवे देण्यात आली.

बँकेच्या मुख्य कचेरीच्या इमारतीचे **'सर विठ्ठलदास ठाकरसी स्मृती भवन'** असे नामकरण करण्यात आले. तसेच मुख्य कचेरी लगत असलेल्या **बेनेट हाऊस** इमारतीचे नामांतर करुन **'वैकुंठभाई मेहता स्मृती भवन'** करण्यात आले. तसेच बँकेच्या **फिफ्सन इमारतीचे** नामांतर करुन **'प्रा.धनंजयराव गाडगीळ स्मृती भवन'** करण्यात आले.

यावेळी सर विठ्ठलदास ठाकरसी, कै.वैकुंठभाई मेहता व प्रा.धनंजयराव गाडगीळ यांच्या प्रतिमेस मा.प्रशासक महोदय यांनी पुष्पहार अर्पण केले. यावेळी बँकेचे अधिकारी / कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

.....